## *मानसिक व शारिरिक विकासासाठी व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेची गरज – डॉ. राजेंद्र गाडे*

*व्यक्तीमत्व विकास म्हणजे केवळ दिसणेच नव्हे तर व्यक्तीचे मानसिक व शारिरिक गुण महत्वाचे असतात असे प्रतिपादन वसंतराव नाईक कृषी व जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. राजेंद्र गाडे यांनी केले.*

*भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे आर्थिक फंडातून वसंतराव नाईक कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे दि. १५ व १६ नोव्हेंबर दोन दिवशीय व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर व्यक्तीमत्व विकासासाठी कार्यरत असणारी अमरावती येथील बी पॉझीटिव्ह अॅडव्हांन्स ट्रेनिंग संस्था, यांच्या तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शन व अनुभवाखाली घेण्यात आले. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी डॉ. राजेंद्र गाडे यांनी आय.सी.ए.आर. – सी.ए., न्यु दिल्ली व डॉ. विलास भाले, कुलगुरू तथा अधिष्ठाता (कृषि) डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्याची संधी महाविद्यालयाला उपलब्ध करून दिल्याबाबत आभार व्यक्त केले. यावेळी बोलतांना डॉ. राजेंद्र गाडे यांनी जीवनात सकारात्मक दृष्टीकोन ठेवून ध्येय निश्चित केल्यास विद्यार्थ्यांना यश मिळणे शक्य आहे, अशा शिबीराने विद्यार्थ्यांना चूक किंवा बरोबर यातील फरक ओळखण्यास मदत मिळते व त्यामुळे त्यांच्यात सकारात्मक बदल घडून येतो असे मार्गदर्शन केले. व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा शिबीरामधून संपूर्ण जीवनाविषयीचे व सर्व विषयांचे ज्ञान विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली असतांना त्याचा परिपूर्ण लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी दिपक जागृत व अनंत घुलशेक, बी पॉझीटिव्ह अॅडव्हांन्स ट्रेनिंग संस्थेचे राष्ट्रीय प्रशिक्षक अमरावती, यांनी विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा शिबीरामध्ये विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य वृध्दिंगत करण्यासाठी समाधिटपणा, स्मरणशक्ती, स्पर्धात्मक परिक्षा, एकाग्रता, शारिरिक व बौध्दीक विकास साधता येतो, तसेच नकारात्मक विचार दूर करून सकारात्मक विचार करण्यास मदत मिळते असे मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेसाठी नोंदणी झालेल्या ११० विद्यार्थ्यांनी कार्यशाळे दरम्यान होणाऱ्या मार्गदर्शनाचा परिपूर्ण लाभ घेतला व त्यानंतर त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.*

*या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सुरक्षा दातारकर हिने केले. तर प्रास्ताविक व आभार प्रा. अंजली गहरवार यांनी केले. या वेळी महाविद्यालयाचे प्रा. धिरज वसुले, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. प्रशांत शिंगोटे, सहाय्यक कुलसचिव, श्री. मंगेश शेटे, डॉ. संदेश बांगर, डॉ. रोशन शिंदे, श्री रूपेश राऊत, आकाश खवले, युगानी राठोड, एकनाथ भंकाळे, दिपाली शिंदे, निळकंठ मानकर, शुभम धार्मिक, रेखा ठाकरे, तसेच सर्व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थीत होते.*


DR. PANJABRAO DESHMUKH KRISHI VIDYAPEETH, AKOLA
VASANTRAO NAIK COLLEGE OF AGRICULTURAL BIOTECHNOLOGY,
YAVATMAL
" Two Days Personality Development Workshop "
Sponsored under - ICAR-CA grants
On
15th to 16th November, 2019
Vasantrao Naik College of Agricultural Biotechnology
Yavatmal






Update Yourself
It Saves a Lots of Extra Effort
1. Words
2. Pictures
" Two Days Personality Development Workshop "
Sponsored under - ICAR-CA grants


PUBLIC
SPEAKING
" Two Days Personality Development Workshop "